सी.एन.आर.क्र. एम.एच.पी.यु.१८–००२४८२–२०१७
नि. फौ. क्र. २९०/२०१७
निशाणी क्र. २६

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. १ :**
कारणे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,
नांव :– गणेश उर्फ रविंद्र कुंडलिक मोरे, वय :– ३३ वर्षे,
धंदा :– बांधकाम व्यवसाय, राहणार :– कुरकूंभ, ता. दौंड, जि. पुणे.

**सरतपास सरकारतर्फे सरकारी वकील श्री. ए. पी. लोहकरे यांच्यामार्फत सुरु :–**

१. मी माझे चुलत भाऊ व चुलत बहिणीच्या नोकरीच्या शोधात होतो. दौंड मध्ये नितीन सकट म्हणुन माझा मित्र आहे. एक दिवस बोलता बोलतो ते म्हणाले की, त्यांचे देखील रेल्वेमध्ये नोकरीचा प्रयत्न चालु आहे. त्यावेळेसे त्यांनी मला सांगितले की, रेल्वेमध्ये संदीप शिवाळ म्हणुन साहेब आहेत. मी त्यांना सांगितले की, माझी त्यांच्यासोबत भेट घालुन द्या. मी संदीप शिवाळला भेटलयानंतर त्यांनी मला सांगितले की, त्यांचे सासरे रेल्वेमध्ये मंत्रालयात सचिव आहेत आणि म्हणुन मी नोकरीला लावु शकतो. त्यांनी मला सांगितले की, रेल्वेमध्ये कॅशियरची एक जागा व क्लार्कची एक जागा रिकामी आहे. त्यांनी मला माझ्या बहिणीचे कागदपत्र मागितले. मी माझ्या व्हॉटसअॅपद्वारे त्यांना कागदपत्रे दाखविले. ते म्हणाले की, काम होईल व माझ्या बहिणीला नोकरी लावणेसाठी रुपये ५०,०००/– व भावाला देखील नोकरी लावणेसाठी रुपये ५०,०००/– खर्च येईल. त्यानंतर दिनांक १७/०७/२०१७ रोजी संध्याकाळी ७.०० वा. हुतात्मा चौक, दौंड येथे बोलावले. त्यावेळेस त्यांनी माझ्याकडे रुपये १५,०००/– मागितले. मी त्यांना रुपये १५,०००/– दिले. त्या दिवशी मी, नितीन सकट व संजय जाधव हूतात्मा चौकात आलो होतो. ते मला म्हणाले की, दोन दिवसांनी तुमच्या बहिणीला वैद्यकीय तपासणी करिता गॅलॅक्सी लॅब येथे घेऊन या. दिनांक १९/०७/२०१७ रोजी सकाळी ८.०० वाजणेच्या सुमारास गॅलॅक्सी लॅब, दौंड येथे गेलो. ते मला म्हणाले की तुम्ही जा, मी तुम्हाला फोन करुन रिपोर्ट कळवितो. दुपारी १२.०० वा. फोन केलयानंतर ते मला म्हणाले की, तुमच्या बहिणीच्या वैद्यकीय तपासणीत प्रॉब्लेम आहे व आपण अडजेस्टमेंट करु, तुम्ही लागलीच रुपये २५,०००/– पाठवुन द्या. त्यानंतर मी संजय जाधव यांच्याकडे रुपये २५,०००/– दिले. दुस–या दिवशी पुन्हा त्यांनी मला फोन करुन रुपये ५,०००/– संजयकडे पाठवुन द्या असे सांगितले. त्यांनी मला माझ्या बहिणीची शुज, ड्रेस, नेमप्लेट, रेल्वेचा पास इ. वस्तु दिल्या व जॉइनिंग लेटर तुम्हाला थोड्याच दिवसात मिळेल असे सांगितले. या सर्व गोष्टी त्यांनी कैलास जाधव यांच्याकडे दिल्या. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, संजय जाधवला कैलास जाधव असेही म्हणतात. त्यानंतर माझ्या बहिणीस जॉइनिंग लेटर आले व त्यांनी आम्हाला सांगितले की, जाईनिंग लेटर उघडायचे नाही मी जेव्हा सांगेल तेव्हाच ते उघडायचे.

२. आम्ही संदीप शेवाळ साहेबांना ब–याच वेळेस फोन लावला, परंतु ते बोलणे टाळत होते. एक दिवस नितीन सकट मला म्हणाला की, पुण्याचे जमादार मॅडम यांना काल फोन आला होता की, तुमचे स्मार्ट कार्ड घेऊन जावा व कोणाला सांगु नका. त्यांनी स्मार्ट कार्डकरिता त्यांच्याकडुन रुपये २,०००/– घेतले. त्यानंतर मी जमादार मॅडम यांना म्हणालो की, संदीप शेवाळे यांनी दौंड येथील ६ ते ७ जणांना फसविले आहे. मला जाधव यांच्याकडुन संदीप शेवाळे यांनी स्मार्ट कार्ड पाठविले.

३. दिनांक १९/०९/२०१७ रोजी मी पुण्याला गेलो. सकाळी १०.३० वा. संदीप शेवाळ तेथे आले. त्यावेळेसे तेथे त्यांच्यासमोर जमादार मॅडम थांबल्या होत्या. ते दोघे तेथे काही तरी बोलले व कृष्णा हॉटेल येथे चहा घेण्याकरिता गेले. त्यानंतर आम्ही त्यांच्या पाठीमागे गेलो व संदीप शेवाळे यांच्यासमोर उभे

राहिलो व त्यांना विचारले की, फोन का उचलत नाही व माझ्या बहिण भावाचे नोकरीचे काय झाले. त्यांनी मला सांगितले की, मी कामात होतो म्हणुन तुमच्याशी बोलु शकलो नाही. मी माझे ओळखीचे असणारे सतीश ढोले साहेबांना फोन केला व त्यांना सांगितले की, माझी फसवणुक झालेली आहे. मी संदीप शेवाळ यांच्यासोबत बोलत असतांना ते तेथे आले व सतिश ढोले साहेबांनी संदीप शेवाळ यांना विचारले की, तुम्ही कोणत्या खात्यात काम करता. त्यावेळेस संदीप शेवाळ यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर मी रेन्झील पोलीस स्टेशन, युनिट क्र. ३ येथे गेलो. तेथे साहेब लोकांनी त्यांच्याकडे चौकशी केली. त्यावेळेस ज्या ज्या लोकांना संदीप शेवाळ यांनी फसविले होते त्या सर्वांना आम्ही तेथे बोलावले होते. त्यानंतर ढोले साहेबांनी दौंड पोलीस स्टेशनला फोन केला. ढोले साहेबांनी आम्हाला त्यांची गाडी दिली व माझ्या गाडीत व साहेबांच्या गाडीत आम्ही सर्वजण दौंड पोलीस स्टेशनला आलो. दिनांक २०/०९/२०१७ रोजी मी आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली. आरोपींनी पोलीस स्टेशनमध्ये सांगितले की, त्यांनी सर्वांना फसवलेले आहे. आता मला फिर्याद दाखविण्यात आली, ती तीच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. फिर्यादीस नि.२७ देण्यात आली. त्यानंतर दिनांक २३/०९/२०१७ रोजी पोलिसांनी मला बोलावले व पोलिसांनी माझ्याकडे चौकशी केली. मला आरोपींनी दिलेले सर्व कागदपत्र व वस्तु मी पोलिसांना दिले व पोलिसांनी माझा पुरवणी जबाब माझ्या सांगण्याप्रमाणे नोंद करुन घेतला. मी आरोपींना ओळखतो, ते आज न्यायालयात हजर नाहीत, ते समोर आले की, मी त्यांना ओळखु शकतो. मला जप्त मुद्देमाल दाखविल्यास मी ते ओळखु शकतो. आता मला जप्त मुद्देमाल बुट दाखविण्यात आले, ते तेच असुन आरोपींनी मला ते दिले होते, त्यास आर्टिकल 'ए' देण्यात आले. तसेच आता मला जप्त मुद्देमाल जॉइनिंग लेटर दाखविण्यात आले, ते कैलास जाधवचे आहे, ते तेच असुन आरोपींनी कैलास जाधव यांना दिले होते, त्यास आर्टिकल 'बी' देण्यात आले व आता मला जप्त मुद्देमाल जॉईनिंग लेटर दाखविण्यात आले, सदरचे जाईनिंग लेटर नितीन यांचे आहे. ते तेच असुन आरोपींनी मला ते दिले होते, त्यास आर्टिकल 'सी' देण्यात आले. आता मला जप्त मुद्देमाल जाईनिंग लेटर दाखविण्यात आले, ते माझ्या बहिणीचे आहे. ते लेटर आरोपींनी माझ्या बहिणीस दिले होते, त्यास आर्टिकल 'डी' देण्यात आले. आता मला जप्त मुद्देमाल स्मार्ट कार्ड दाखविण्यात आले, ते माझ्या बहिणीचे आहे. ते कार्ड आरोपींनी माझ्या बहिणीस दिले होते, त्यास आर्टिकल 'इ' देण्यात आले. आता मला जप्त मुद्देमाल पिवळ्या रंगाचा सलवार कुर्ता व पांढ–या रंगाची ओढणी दाखविण्यात आले, ते माझ्या बहिणीचे आहे. त्यास आर्टिकल 'एफ' देण्यात आले. आता मला जप्त मुद्देमाल मध्ये रेल्वेचे हजेरी पत्रक दाखविण्यात आले, ते हजेरी पत्रक आरोपींनी मला दिले होते, त्यास आर्टिकल 'जी' देण्यात आले. आता मला जप्त मुद्देमाल स्मार्ट कार्ड दाखविण्यात आले, ते माझ्या बहिणीचे आहे. ते स्मार्ट कार्ड आरोपींनी मला दिले होते, त्यास आर्टिकल 'एच' देण्यात आले. आता मला जप्त मुद्देमाल नेम प्लेट दाखविण्यात आले, ते माझ्या बहिणीचे आहे. ते लेटर आरोपींनी मला दिले होते, त्यास आर्टिकल 'आय' देण्यात आले.

सरतपास संपला.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्रीमती के. बी. भोसले यांच्यामार्फत सुरु :–**

४. मला लिहिता वाचता येते. माझे शिक्षण इयत्ता दहावीपर्यंत झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा शेती डेव्हलपमेंट करण्याचा व्यवसाय आहे. मी कुरकूंभ येथे राहण्यास आहे. माझी बहिण पल्लवी व चुलती पुण्यात राहतात. माझ्या बहिणीचे शिक्षण इयत्ता बारावीपर्यंत झालेले आहे. माझ्या बहिणीचे शिक्षण पुणे येथे झाले आहे. माझा चुलत भाऊ आकाश पुण्यात राहतो व त्याचे शिक्षण दहावीपर्यंत झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, नितीन सकट माझा मित्र आहे. माझी व नितीन ओळख साधारण १० ते १२ वर्षापासुन ओळख आहे. मी वर्तमानपत्रात नोकरी बाबतची जाहिरात पाहिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, नितीन सकट याने मला सांगितले की, रेल्वेमध्ये महिलाकरिता एक जागा शिल्लक आहे. नितीन सकट याने मला रेल्वेमध्ये जागा

उपलबध असल्याबाबत रेल्वेचे लेटर पॅड दाखविले. हे म्हणणे खरे नाही की, माझे मित्र कैलास उर्फ संजय जाधव आहेत. संजय जाधव काय काम करतात हे मला माहित नाही, ते संदीप शेवाळ यांच्याकडे काम करतात. हे म्हणणे खरे नाही की, नितीन सकट, संजय जाधव यांच्या शेती डेव्हलपमेंटचे काम करतो. हे म्हणणे खरे आहे की, नितीन सकट सोबत माझे बोलणे चालणे आहे. हे म्हणणे खरे नाही की, तो माझ्यासोबत शेतीचे कामे करतो. हे म्हणणे खरे आहे की, नितीन सकटनेच मला सांगितले की, संदीप शेवाळे रेल्वेमध्ये कामे लावतात. संदीप शेवाळ हे रेल्वेमध्ये अधिकारी व त्यांचे सासरे मंत्रालयात सचिव आहेत याबाबत मी वैयक्तिक चौकशी केली नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, त्याबाबत आरोपींनीच सांगितल्यामुळे मी त्याबाबत चौकशी केली नाही.

५. दिनांक १७/०७/२०१७ रोजी मी पहिल्यांदा पैसे दिले. रक्कम रुपये ६०,०००/– चा व्यवहार झाला होता. मी आरोपीला रक्कम दिल्याबाबत आजपावेतो कागदपत्रो पुरावा न्यायालयात दाखल केला नाही. दिनांक १७/०७/२०१७ रोजी भावाला नोकरी लावणेकरिता रुपये ५०,०००/– खर्च होईल व बहिणीला नोकरी लावणेकरिता रुपये ५०,०००/– खर्च येईल असे आरोपीने मला सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी मी पैसे नितीन सकटच्या हाती दिले. दिनांक १९/०७/२०१७ रोजी संदीप शेवाळ यांनी मला माझ्या बहिणीला घेऊन गॅलॅक्सी लॅबमध्ये घेऊन येण्यास सांगितले. माझ्या बहिणीचे ब्लॅड व युरिन टेस्ट करण्यात आले. त्यादिवशी डॉक्टरांनी रिपोर्ट आमच्याकडे दिला नाही, संदीप शेवाळ यांच्याकडे दिला. त्यादिवशी मी रिपोर्टची मागणी केली, परंतु संदीप शेवाळ यांनी सांगितले की, डॉक्टर मला रिपोर्ट देतील. मी इतर कोणत्याही डॉक्टरांना तो रिपोर्ट दाखविला नाही. लॅबमध्ये गेल्यानंतर मला चार अंकी नंबर दिला तो चारअंकी नंबर काय आहे तो आजरोजी मला सांगता येणार नाही. मी संजय जाधव यांच्याकडे दिलेली रक्कम संदीप शेवाळ यांना पोहोचली की नाही याबाबत चौकशी केली. संदीप शेवाळ यांना ती रक्कम पोहोचली. हे म्हणणे खरे नाही की, सदरची रक्कम मी कैलास जाधव यांच्या हाती दिली व संदीप शेवाळ यांच्याकडे दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरची रक्कम मी संदीप शेवाळ यांच्या कडे रक्कम रोख स्वरुपात दिली नाही.

६. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी माझ्यासोबत व्यवहार करण्यापुर्वी त्यांचा व्यवहार नितीन सकट यांच्यासोबत झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, नितीन सकट यांनी आरोपीसोबत व्यवहार केला हे नितीन सकट यांनी घटनेच्या वेळेस सांगितली नाही. पल्लवी मोरे यांचा जप्त मुद्देमाल ड्रेस आर्टिकल 'एफ' कोठेही मिळु शकतो. हे म्हणणे खरे आहे की, ड्रेसवर कोणतीही शिक्का नाही. साक्षीदार स्वतः सांगतात की, ड्रेसवर नेमप्लेट लावलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, जप्त मुद्देमाल जॉइनिंग लेटर मधील मजकुर कोठुनही टंकलिखीत करुन घेता येतो. हे म्हणणे खरे आहे की, जप्त मुद्देमाल पल्लवीचे जाईनिंग लेटरवर आरोपीची सही नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त मुद्देमाल बुट हे बाजारात सहज उपलब्ध होऊ शकतात. जप्त मुद्देमाल नेमप्लेट हे बाजारात मिळु शकते किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. जप्त मूद्देमाल गॅलॅक्सी लॅब या रिपोर्टवर मध्य रेल्वेतर्फे पाठविण्यात आले आहे असा मजकुर नमुद नाही.

न्यायालयाची वेळ संपल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

ठिकाण : दौंड

**(श्रीमती एस. डी. अवसेकर)**

दिनांक :०५.०१.२०१९.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, पुणे.

**<u>उलटतपास शपथेवर पुढे सुरु</u> :–**

७. हे खरे आहे की, जप्त मुद्देमाल हजेरी पत्रकावर रेल्वेची सही शिक्का नाही व आरोपीची सही नाही. मी पोलिसांना फिर्याद देतेवेळेसे सांगितले होते की, मला नितीन सकट यांनी सांगितले की, आरोपी संदीप शेवाळ यांनी जमादार मॅडम यांना दोन हजार रुपये मागितले, तसा मजकुर माझ्या फिर्यादीमध्ये का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. मी पोलिसांना फिर्याद देतेवेळेस 'माझ्या बहिणीचे कागदपत्र मी आरोपीला व्हॉटसअॅपद्वारे दाखविले' हे सांगितले नाही. हे खरे आहे की, ते कागदपत्र आजरोजी न्यायालयात दाखल नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, मी ते दाखल करण्यास तयार आहे.

८. दिनांक २०/०७/२०१७ रोजी मी फिर्याद दिली होती. फिर्याद देतेवेळेस मी, नितीन सकट, कैलास जाधव, भिमा जमादार व इतर ३ ते ४ व्यक्ती असे मिळुन गेलो होतो. साक्षीदार पुन्हा सांगतात की, दिनांक २०/०९/२०१७ रोजी मी फिर्याद दिली होती. सदर दिवशी अंदाजे रात्रीचे ०९.०० ते ९.३० वाजणेच्या सुमारास मी फिर्याद देण्यासाठी गेलो होतो. हे खरे आहे की, प्रस्तुतची घटना ही दिनांक १७/०७/२०१७ रोजी घडली. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, मी आरोपीला जुलै महिन्यात पैसे दिले. फिर्याद देण्याकरिता उशिर झाला कारण त्यादरम्यान मेडिकल झाले व प्रक्रियेनुसार कामकाज चालु होते तसेच जॉईनिंग लेटर येणार असे आम्हाला सांगण्यात आले होते, तसेच आरोपी मिटींगकरिता दिल्लीला जाणार आहे असे आम्हाला सांगण्यात आले होते. हे खरे नाही की, फिर्याद दिल्यानंतर मी पोलीस ठाण्यात गेलो नाही. हे खरे नाही की, नितीन सकट यांच्या सांगण्यावरुन मी कैलास जाधव यांच्याकडे रक्कम दिली. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, मला आरोपीने रक्कम देण्यास सांगितले होते. हे खरे आहे की, कैलास जाधव उर्फ संजय जाधव यानेच माझ्या बहिणीचा ड्रेस, नेमप्लेट, शुज, जॉईनिंग लेटर आणुन दिले. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, आरोपीने ते सर्व काही संजय जाधव यांच्याकडे दिले व म्हणुन संजय जाधव याने माझ्या बहिणीचा शुज, जॉईनिंग लेटर माझ्याकडे आणुन दिले. हे खरे नाही की, माझा व्यवहार आरोपी संदीप शेवाळ यांच्याशी न होता नितीन सकट व संजय जाधव यांच्याशी झाला. हे खरे नाही की, माझे शेतीचे व्यवहार माझे मित्र नितीन सकट व कैलास जाधव यांच्याशी होत होते. हे खरे नाही की, नितीन सकट व संजय जाधव यांनी आरोपीच्या नावाखाली माझ्याकडुन पैसे हस्तगत केले आहे. मी आरोपीला जी रक्कम दिली ती माझी स्वतःची रक्कम आहे. हे खरे नाही की, मी संपुर्ण व्यवहार हा नितीन सकट यांच्या सांगण्यावरुन केला. हे खरे नाही की, जो काही व्यवहार व नोकरीसंदर्भातील जी काही चर्चा ही नितीन सकट यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवुन मी केली. हे खरे नाही की, आरोपी यांनी स्वतः मला 'मी रेल्वेत नोकरी लावतो किंवा माझे सासरे मंत्रालयात सचिव आहे' या संदर्भात बोलले नाही. हे खरे नाही की, नितीन सकट व कैलास जाधव यांनीच माझी फसवणुक केली आहे. साक्षीदार स्वतः सांगतात की, आरोपीने माझी फसवणुक केली आहे. हे खरे नाही की, आरोपीने रेल्वेमध्ये नोकरीला लावतो यासंदर्भात माझी कसल्याही फसवणुक केली नाही. हे खरे नाही की, मी आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे व आज खोटी साक्ष देत आहे.

उलटलपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

**(श्रीमती एस. डी. अवसेकर)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, पुणे.

ठिकाण : दौंड

दिनांक : १०.०१.२०१९.

# <u>शेरा</u>

मी शपथेवर सांगतो की या पी.डी.एफ न्यायनिर्णय फाईलमधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :: | अतनुरे एम. सी. |
| कोर्टाचे नांव | :: | श्रीमती एस. डी. अवसेकर<br>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, जि.पुणे |
| दिनांक | :: | १०/०१/२०१९ |
| पिठासीन अधिका–याने निकालपत्रावर सही केलेचा दिनांक | :: | १०/०१/२०१९ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | :: | ११/०१/२०१९ |